## :: प्रसिध्दी पत्रक ::

आरोपी लोकसेवक - १.अमृता श्रीकांत हाट्टे,पर्यवेक्षीका वय ३६ वर्ष नेमणक एकात्मीक बाल विकास सेवा योजना कार्यालय,आष्टी वर्ग ३ रा.आष्टी ता.जि.बीड २. नीता रामदास मलदोडे,कनिष्ठ सहायक वय २९ वर्ष एकात्मिक बाल विकास सेवा योजना,आष्टी वर्ग-३ यांना ५०००/- ( पॉच हजार रुपये) लाच मागणी करुन स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बीड यांच्या जाळयात.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | बीड |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | आष्टी |
| आरोपीचे नांव व कार्यालय पत्ता | १.अमृता श्रीकांत हाट्टे,पर्यवेक्षीका वय ३६ वर्ष नेमणुक एकात्मीक बाल विकास सेवा योजना कार्यालय,आष्टी वर्ग ३ रा.आष्टी ता.जि.बीड २. नीता रामदास मलदोडे,कनिष्ठ सहायक वय २९ वर्ष एकात्मिक बाल विकास सेवा योजना,आष्टी वर्ग-३ |
| लाच मागणी रक्कम | ५०००/- रुपये ( पॉच हजार रुपये) |
| सापळा अधिकारी | श्री.गुलाब बाचेवाड,पोलीस निरीक्षक,लाप्रवि,बीड. |
| लाच मागण्याचा हेतु | यातील तकारदार ही अंगणवाडी सेविका असून सदरची अंगणवाडी ही मिनी अंगणवाडी होती ती महाराष्ट शासनाच्या १० जानेवारी २०२४ च्या जीआर प्रमाणे वर्धित होउन मोठी अंगणवाडी झाली आहे त्यासाठी आम्ही आपले अंगणवाडी चे चांगले अहवाल पाठविलेले आहेत. त्यामुळे तुमची पगार ६००० रुपये वरुन १०००० रुपये झाली आहे आम्हाला बक्षीस म्हणुन ५००० रुपये द्या म्हणुन ५००० रुपये लाच मागणी आरोपी कमांक एक अमृता हाट्टे व दोन नीता मालदोडे यांनी केली व आरोपी कमांक दोन हिने पाच हजार रुपये लाच रक्कम स्विकारली असुन दोन्ही लोकसेवक यंना ताब्यात घेतले असुन पोलीस स्टेशन आष्टी येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकिया सुरु आहे. |
| थोडक्यात माहिती | दिनांक ३०/०७/२०२४ रोजी तकारदार यांनी तकार दिली की, यातील तकारदार ही अंगणवाडी सेविका असून सदरची अंगणवाडी ही मिनी अंगणवाडी होती ती महाराष्ट शासनाच्या १० जानेवारी २०२४ च्या जीआर प्रमाणे वर्धित होउन मोठी अंगणवाडी झाली आहे त्यासाठी आम्ही आपले अंगणवाडी चे चांगले अहवाल पाठविलेले आहेत. त्यामुळे तुमची पगार ६००० रुपये वरुन १०००० रुपये झाली आहे आम्हाला बक्षीस म्हणुन ५००० रुपये लोकसेवक हाट्टे व मलदोडे हे ५०००/- रुपये लाचेची मागणी करत आहेत. तकारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड येथे तकार दिली.<br>त्यावरुन दिनांक.३०/०७/२०२४ रोजी लाचमागणी पडताळणी केली असता यातील तकारदार यांना आलोसे यांनी मीनी अंगणवाडी असतांना चांगले अहवाल पाठविलेले आहेत. त्यामुळे शासनाचे जीआर प्रमाणे तकारदार यांची पगार ६००० रुपये वरुन १०००० रुपये झाली आहे आम्हाला बक्षीस म्हणुन ५००० रुपये लाचेची पंचासमक्ष मागणी करुन ती स्वत: स्विकारण्याचे मान्य केले.<br>दिनांक ०२/०८/२०२४ रोजी सापळा लावला असतां एकात्मिक बाल विकास सेवा योजना कार्यालय,पंचायत समीती,आष्टी येथे आलोसे श्रीमती.हाट्टे व मलदोडे यांनी पंचासमक्ष ५०००/- ( पॉच हजार रुपये ) लाच रक्कम स्विकारले असतां त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.<br>१.अमृता श्रीकांत हाट्टे,पर्यवेक्षीका वय ३६ वर्ष नेमणुक एकात्मीक बाल विकास सेवा योजना कार्यालय,आष्टी वर्ग ३ रा.आष्टी ता.जि.बीड २. नीता रामदास मलदोडे,कनिष्ठ सहायक वय २९ वर्ष एकात्मिक बाल विकास सेवा योजना,आष्टी वर्ग-३ यांना पंचासमक्ष तकारदार यांचेकडुन ५०००/-रुपये लाचेची मागणी करुन सदर लाच रक्कम स्विकारल्या वरुन त्यांचे विरुध्द पोलीस ठाणे आष्टी जिल्हा बीड येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रकिया सुरु आहे. |

सदरची कारवाई मा.संदीप आटोळे,पोलीस अधीक्षक, लाप्रवि छत्रपती संभाजी नगर,मुकुंद अघाव,अपर पोलीस अधीक्षक,लाप्रवि छत्रपती संभाजी नगर, श्री.शंकर शिंदे, पोलीस उप-अधीक्षक,बीड यांचे मार्गदर्शनाखाली,श्री.गुलाब बाचेवाड,पोलीस निरीक्षक,ला.प्र.वि,बीड, व पोलीस अंमलदार श्रीराम गिराम,सुदर्शन निकाळजे,अमोल खरसाडे,अंबादास पुरी चालक गणेश म्हेत्रे सर्व ला.प्र.वि.बीड युनिट यांनी कारवाई केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तकार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधवा.

| | |
|---|---|
| संपर्क पत्ता | :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड |
| संकेतस्थळ | :- **acbwebmail@mahapolice.gov.in** |
| ई-मेल | :- १) **dyspacbbeed@mahapolice.gov.in**<br>2) **dyspacbbeed@gmail.com** |
| ऑनलाईन तकार ॲप्लीकेशन | :- **acbmaharashtra.net** |
| टोल फ्रि कमांक | :- १०६४ |
| दुरध्वनी कमांक | :- ०२४४२-२२२६४९ |
| व्हॉटस अप क. | :- ९९३०९९७७०० |
| पोलीस अधीक्षक,लाप्रवि, छत्रपती संभाजी नगर | :- ९९२३०२३३६१ |
| अपर पोलीस अधीक्षक,लाप्रवि, छत्रपती संभाजी नगर | :- ९८८१४६०१०३ |
| पोलीस उप अधीक्षक,लप्रपवि,बीड | :- ९३५५१००१०० |

पोलीस उप.अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड